# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/07/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## दुखापत

**१) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील सिल्लेवाडा हरिहर हॉटेल जवळ येथे दिनांक १८/०७/२०२३ चे १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रतीक लीलाधर चवरे, वय २४ वर्ष वार्ड क्र. ५ सिल्लेवाडा खापरखेडा व आरोपी नामे— १) पप्पू रा. हवामहल सिल्लेवाडा २) परवेज रा. लाल चौक कॉलनी सिल्लेवाडा ३) युसुफ खान रा. हिंदी ग्राउंड चे जवळ सिल्लेवाडा हे एकाच गावात राहत असून फिर्यादी आरोपीला ओळखत असून फिर्यादीचा चार महिन्यापूर्वी आरोपी सोबत वादविवाद झाला होता. परंतु फिर्यादीने आरोपी विरुद्ध रिपोर्ट दिली नाही. फिर्यादी हा सिल्लेवाडा येथील हरिहर हॉटेलमध्ये नाश्ता करण्याकरिता गेला असता यातील आरोपी हे सिल्लेवाडा हरिहर हॉटेल जवळ असलेले हनुमान मंदिर जवळ बसले होते फिर्यादीला पाहून आरोपी हे फिर्यादी जवळ आले व शिवीगाळी करून म्हणाले की ''तू आज कल ज्यादा गरम चल रहा है'' असे म्हणून आरोपी क्रमांक १) याने फिर्यादीच्या दोन्ही गालावर थापडा मारून खाली पाडले व हातात दगड घेऊन पाठीवर मारले तसेच आरोपी क्रमांक २) व ३) याने लाथाने मारले त्यामुळे फिर्यादीच्या पाठीला व चेहऱ्याला मार लागला व तीनही आरोपीने शिवीगाळी करून पुन्हा तू जर दिसला तर तुला जीवाने मारून टाकीन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अमोल लोहकरे, मो. नं. ९९२३१०४३१० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत २६ कि.मी. अंतरावरील मौजा देवळी काळबांडे शिवार येथे दिनांक १८/०७/२०२३ चे १०.३० वा. ते ११.०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे— चेतन मनोहर उइके, रा. देवळी काळबांडे याने फिर्यादी नामे— प्रशांत गजानन हुके, वय ३९ वर्ष रा. देवळी काळबांडे यास माझा शेताजवळ गाई चारू नको असे म्हटले असता फिर्यादी याने मी इथेच चारणार असे म्हटले असता नमुद आरोपी याने फिर्यादी सोबत भांडण केले व फिर्यादीच्या उजव्या कानाला चावा घेवुन जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार भोजराज तांदुळकर ब. नं. ५०६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर